# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०७ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- एचएमपीव्ही संसर्गाबाबत घाबरू नये; मात्र खबरदारी घेण्याबाबत राज्यशासनाचं आवाहन
- राज्यातील चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य
- भंडारा जिल्ह्यात वाघाच्या शिकार प्रकरणी तीन जणांना अटक
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

आणि

- तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवाला घटस्थापनेनं प्रारंभ

****

एचएमपीव्ही संसर्गाबाबत घाबरण्याचं कारण नाही, मात्र खबरदारी घेण्याचं आवाहन राज्यशासनानं केलं आहे. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसंच वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. हा नवीन आजार नाही, गेल्या वर्षभरात देशात या आजाराचे रुग्ण आढळले होते, ते सर्व रुग्णालयात दाखल न होता बरे झाल्याचं आबिटकर यांनी सांगितलं. ते म्हणाले –

***आय सी एम आरनं ज्या वेळेला भारतामध्ये फेब्रुवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ मध्ये संभाव्य एच एन पी व्ही च्या विषाणूची आठ हजार बावन नमुन्यांच्या चाचण्या केल्या होत्या. या सगळ्या चाचण्यांच्या मध्ये एकूण १७२ पॉझिटीव्ह अशा पद्धतीच्या चाचण्या निघाल्या आहेत. फेब्रुवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ मध्ये ही सर्व प्रकरणं सौम्य होती. आणि त्याप्रमाणे या कुठल्याही पेशंटला ॲडमिट न करता सुद्धा***

***यातला कुठलाही पेशंट न दगावता सुद्धा अत्यंत चांगल्या पद्धतीनं ते बरे झालेत.***

या आजाराबाबत अनावश्यक भीती बाळगू नये, असं सांगताना, माध्यमांनी यासंदर्भातली वस्तुस्थिती जनतेसमोर ठेवण्याचं आवाहन आबिटकर यांनी केलं.

***हा आजार नवीन नाहीये. किंवा याच्यामुळे फार मोठा धोका होतोय अशातला भाग नाही. फक्त काळजी घेणं आणि सुरक्षित पद्धतीनं त्याच्यावरती उपचार करणं आणि आपण सगळ्यांनी सुद्धा, माझी मिडीयाला सुद्धा विनंती आहे की, आपण सगळ्यांनी याबाबतची वस्तुस्थिती लोकांना सांगू या. केंद्र शासानाचे जे निर्देश येतील ते निर्देश आणि आपल्या आरोग्य विभागाची आणि वैद्यकीय शिक्षण विभागाची टीम अत्यंत चांगल्या पद्धतीनं काम करतोय. खूप चांगली टीम आपल्याकडची तयार आहे. त्या सगळ्या टीमचा आपण उपयोग करू या. आणि या एकूण आजाराची जी काही अनावश्यक भीती आपण बाळगतोय ती अनावश्यक भीती न बाळगता जे पेशंटस् असतील त्यांना आपण राईटली ट्रीट करण्यासाठी आपण सगळे जण काम करू या.***

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी बोलतांना, राज्यात आतापर्यंत या संसर्गाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, असं स्पष्ट केलं आहे. तरीही सर्व वैद्यकीय महाविद्यालयांनी औषधांसह ऑक्सिजन आणि आवश्यकता वाटल्यास विलगीकरण व्यवस्थेच्या तयारीत राहावं, आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द कराव्यात अशा सूचना मुश्रीफ यांनी दिल्या.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय-घाटीमध्ये सर्व व्यवस्था उपलब्ध असून, कोविड व्यवस्थापनाचा अनुभव असल्यानं, कोणतीही भीती बाळगण्याची गरज नसल्याचं, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ शिवाजी सुक्रे यांनी म्हटलं आहे.

***सद्याच्या स्थितीमध्ये हा आजार जो आहे, इतका जास्त धोकादायक नाही. यासाठीची संपूर्ण व्यवस्था छत्रपती संभाजीनगर येथील घाटीमध्ये उपलब्ध आहे. कुठल्याही प्रकारची भीती सध्याच्या स्थितीमध्ये नाहीये. आणि भविष्यामध्येही येणार नाही. आपण कोविडचा चांगल्या प्रकारे मुकाबला केला आहे. गरज भासली तर रूग्णालयात येऊ उपचार घ्यावेत. कुणी स्वत:च्या मनाने यासाठी औषध उपचार घेऊ नये.***

✻✻✻✻

हिंगोली जिल्हा शासकीय रुग्णालयात खबरदारी म्हणून, २४ खाटांचा अतिदक्षता विभाग सज्ज करण्यात आला असून, उपजिल्हा रुग्णालय तसंच ग्रामीण रुग्णालयातूनही काही खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. नागरिकांनी घाबरून जाऊ नये असं आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केलं आहे.

✻✻✻✻

मुंबई महानगर क्षेत्रामध्ये भविष्यात केबल कार प्रकल्प राबवण्यास केंद्रीय वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तत्वतः मान्यता दिली आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. लवकरच या प्रकल्पाचं सर्वेक्षण करून विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश गडकरी यांनी या विभागाच्या सचिवांना दिल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

✻✻✻✻

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्यातील सर्व अधिकाऱ्यांसाठी सात कलमी कृती कार्यक्रम जाहीर केला. प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करण्याच्या कामांबाबत त्यांनी सविस्तर सूचना केल्या. यासंदर्भात काय कार्यवाही केली याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

✻✻✻✻

राज्यातील चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य करण्यात आला आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली. येत्या १ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल. वाहनावर फास्ट टॅग कार्यरत नसेल तर वाहन धारकाला कोणत्याही माध्यमातून

दुप्पट पथकर भरावा लागेल. राज्यात एमएसआरडीसीचे ५० पथकर नाके तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे २३ पथकर नाके आहेत.

****

भंडारा जिल्ह्यात एका वाघाची शिकार केल्या प्रकरणी आज तीन जणांना पोलिसांनी अटक केली. तुमसर वनविभागाचे कर्मचारी काल झंझेरिया बिटमध्ये गस्त घालत असताना एका तलावाजवळ एका मादी वाघाची मान, धडाचे दोन तुकडे, शेपटीचा एक भाग असे चार तुकडे कापलेल्या अवस्थेत सापडले होते. त्या प्रकरणी आज ही कारवाई करण्यात आली.

****

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं खासगी डेटा सुरक्षा नियमावलीचा मसूदा जाहीर केला आहे. सर्वसामान्य नागरिकांना पुढच्या महिन्याच्या १८ तारखेपर्यंत माय गोव्ह च्या माध्यमातून या मसुद्यावर प्रतिक्रिया देता येणार आहेत.

****

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कारांची आज घोषणा करण्यात आली. २०२२ या वर्षासाठी प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ या वर्षाचा पुरस्कार आसामी कवी नीलम कुमार यांना जाहीर झाला आहे. एक लाख रुपये, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

अमेरिकन मेरिट कौन्सिलने प्रदान केलेला गौरव अहिल्यानगर जिल्ह्यासाठी निश्चितच भूषणावह असल्याचं, निवडणूक आयोगाचे आयुक्त सुखविंदर संधू यांनी केलं आहे. ते आज शिर्डी इथं बोलत होते. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी संधू यांच्या हस्ते कौन्सिलचं गौरवपत्र स्वीकारलं. स्वीप – मतदार जनजागृती उपक्रमांतर्गत राबवलेल्या विविध नावीन्यपूर्ण संकल्पनांमुळे मतदानाची टक्केवारी वाढल्याचं जिल्हाधिकारी सालीमठ यांनी सांगितलं.

****

श्री तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवाला आज घटस्थापनेनं प्रारंभ झाला. संबळाचा कडकडाट, तुतारीचा निनाद आणि आई राजा उदोच्या गजरात विधिवत घटस्थापना करण्यात आली. तत्पूर्वी, आज पहाटे देवीची सिंहासनावर

प्रतिष्ठापना करण्यात आली. या नवरात्रोत्सवात प्रमुख मानली जाणारी जलकुंभ यात्रा ११ जानेवारीला काढण्यात येणार असून, शाकंभरी नवरात्र महोत्सवाच्या काळात तुळजाभवानी देवीच्या विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहेत.

****

अंबाजोगाई इथल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात परवा नऊ जानेवारीला प्राचार्य बी. के. सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. ज्येष्ठ विचारवंत जयदेव डोळे यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन होणार आहे. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ क्रमाकांना रोख रक्कम आणि ढाल असं पुरस्काराचं स्वरूप असलेल्या या स्पर्धेत राज्यातल्या वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेण्याचं आवाहन संयोजकांनी केलं आहे.

****

लातूर इथं येत्या १०, ११ आणि १२ जानेवारी दरम्यान तीन दिवसीय मराठवाडा शैक्षणिक महासंमेलन आणि प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. संयोजन समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरळे यांनी आज लातूर इथं ही माहिती दिली. या महासंमेलनात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या प्रेरणादायी मुलाखती आणि तज्ज्ञांच्या व्याख्यानांसह, नाविन्यपूर्ण, अद्ययावत, शैक्षणिक साधनांचे १०० पेक्षा अधिक स्टॉल्स पाहता येणार आहेत.

****

नांदेड इथ भरवण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोन्नती अभियानाच्या मिनी सरस विक्री प्रदर्शनाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. या प्रदर्शनात हस्तनिर्मित वस्त्रे, खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, मसाले, सजावटीच्या वस्तू अशा विविध प्रकारच्या उत्पादनाची दालनं लावण्यात आली आहे. येत्या १० जानेवारीपर्यंत हे प्रदर्शन सर्व नागरिकांसाठी खुलं राहणार आहे.

****

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात जातीय तणाव निर्माण करणाऱ्यांविरोधात शासनाने कारवाई करावी, अशी मागणी बहुजन विकास मोर्चाचे नेते बाबुराव पोटभरे यांनी केली आहे. ते आज बीड इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. सरपंच हत्या प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

****

रस्ते सुरक्षेबाबत मुलांनीच आपल्या पालकांना शिक्षण देण्याची आवश्यकता वाटत असल्याचं, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी म्हटलं आहे. आज रस्ता सुरक्षा अभियानाचं उद्घाटन करतांना ते बोलत होते. गेवराई इथं लालबहादूर शास्त्री चौकात या अभियानाची आज सुरुवात करण्यात आली, यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली.

****

पूर्णा जालना आणि जालना नांदेड या गाड्यांच्या क्रमांकात तसेच जालना नांदेड या गाडीच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. हे सर्व बदल आजपासून लागू झाले. प्रवाशांनी याची नोंद घेण्याचं आवाहन रेल्वे व्यवस्थापनानं केलं आहे.

दरम्यान, दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात रोटेगाव आणि परसोडा स्थानकादरम्यान रेल्वे मार्गाची देखभाल - दुरुस्ती करण्यासाठी उद्यापासून १७ जानेवारीपर्यंत लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्सप्रेस धर्माबाद ते नांदेड दरम्यान तर नगरसोल-नरसापुर एक्सप्रेस नगरसोल ते लासुर दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. दरम्यान, याच काळात मुंबई -नांदेड तपोवन एक्सप्रेस दोन तास उशिरा धावणार आहे, असं दक्षिण मध्य रेल्वेच्या जनसंपर्क कार्यालयाने कळवलं आहे.

****